महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय,लेखा व कोषागारे
कस्तुरी इमारत, तळ मजला,
पेट्रोलियम हाऊस समोर, ज.द.मार्ग, चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.
दूरध्वनी क्रमांक:०२२- २२८८०१०६/१७ ईमेल : ad.admin@mahakosh.in संकेतस्थळ:www.mahakosh.gov.in

क्र.संलेको/प्रशा-राप/राजभवन/ले.अ./1280

दिनांक : 14 OCT 2024

## // परिपत्रक //

**विषय : महाराष्ट्राचे मा.राज्यपाल यांचे सचिव कार्यालयातील, राजभवन मलबार हिल, मुंबई येथील लेखा अधिकारी गट-ब (राजपत्रित) हे पद प्रतिनियुक्तीने भरणेबाबत.**

महाराष्ट्राचे मा.राज्यपाल यांचे सचिव कार्यालय, वाळकेश्वर रोड, मलबार हिल, मुंबई येथील महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील लेखा अधिकारी गट-ब (राजपत्रित) हे पद प्रतिनियुक्तीने भरावयाचे आहे.

सदर कार्यालयातील प्रचलित कार्यपद्धतीनुसार खालील अर्हता व अनुभव धारण करीत असलेल्या लेखा अधिकाऱ्यांची आवश्यकता आहे.

१) मागील पाच वर्षांचे गोपनीय अहवाल किमान उत्कृष्ट दर्जाचे असावेत.

२) सेवार्थ प्रणाली, बिल पोर्टल, वेतनिका, बिडीएस (अर्थसंकल्पीय प्रणाली) व इतर संगणक हाताळणीचे उत्तम प्रकारे ज्ञान असणे आवश्यक आहे.

३) तसेच आस्थापना विषयक व लेखा विषयक कामकाजाचा अनुभव असणेही आवश्यक आहे.

कार्यरत पदावर किमान १ वर्ष सेवा झालेले तसेच वर नमुद अर्हता पूर्ण करीत असलेले अधिकारी राजभवन येथील लेखा अधिकारी पदासाठी अर्ज करण्यासाठी पात्र राहतील.

तरी महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील लेखा अधिकारी संवर्गातील इच्छुक अधिकाऱ्यांनी त्यांचे अर्ज दि.१८.१०.२०२४ पर्यंत संचालनालयास सादर करावेत. प्राप्त नामिकासूचीच्या आधारे लेखा अधिकारी यांची मुलाखत मा.राज्यपालांचे सचिवालय यांचे कार्यालयाकडून घेण्यात येईल.

(रश्मी नांदिवडेकर)
सहसंचालक (प्रशासन),
लेखा व कोषागारे, मुंबई

प्रत : महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-ब (राजपत्रित) लेखा अधिकारी संवर्गातील सर्व अधिकारी.